# MAHATET 2018 Paper-II

## Previous Year Paper
(Social Science)
(Mar. Med.)

# महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (TET) पेपर II

**परीक्षा दिनांक : १५ जुलै २०१८**

वेळ - २.५ तास (१५० मिनिटे)

एकूण गुण - १५०

## PART -I ENGLISH

**1.** Selecct the world which best expresses the meaning of the underlined words in the given sentence:
Raju is interested in the medical science which is related to the study and treatment of the diseases of the skin.
(1) Paediatrics (2) Dermatology (3) Neurology (4) Gynaecology

**2.** Select the correct antonyms of Extravagant.
(1) Sensible (2) Careful (3) Economical (4) Balanced

**3.** Name the Part of Speech of the underlined word:
(1) Preposition (2) Conjunction 3) Adjective (4) Adverb

**4.** Choose the correct Preposition in the given sentence:
She is sitting_____her mother and father.
(1) among (2) between (3) in (4) at

**5.** Name the figure of speech in the following line:
A sea of people listened to the leader.
(1) Antithesis (2) Personification
(3) Metaphor (4) simile

**6.** Select the correct Active voice sentence of the given sentence:
Let the door be opened.
(1) To open the door (2) Open the door
(3) Opened the door (4) To be opened the door

**7.** Choose the correct comparative degree of the given sentence :
Very few judicial systems in the world are as good as Indian judicial system.
(1) Indian judicial system are better than the most other judicial system in the world.
(2) Indian judicial system is better than any other judicial systems in the world.
(3) Indian judicial system is more better than any other judicial systems in the world.
(4) Indian judicial system is better than most other judicial systems in the world.

**8.** Choose the correct Modal Auxilary showing strong obligation.
(1) Soldiers may obey orders without question.
(2) Soldiers must obey orders without question.
(3) Soldiers can obey orders without question.
(4) Soldiers will obey orders without question.

**9.** Choose the correct use of enough in the following sentence.
(1) She is very strong enough walk five miles every day.
(2) She is so strong enough to walk five miles every day.
(3) She is strong enough to walk five miles every day.
(4) She is enough strong to walk five miles every day.

adda247

**10.** Select the most appropriate alternative to fill in the blank. What are you ____ in the kitchen cupboard?

(1)looking in (2) looking on (3) looking after (4) looking for

**Read the following passage carefully and select the most correct answers of the given questions: (Q. 11 to Q. 15)**

The functional declines of advancing age are depressing. The hearts ability to pump blood drops about one per cent: blood flows to arms and legs decrease by thirty to forty percentage in old age. The amount of air a person can exhale after a deep breath lessens and the chest walls stiffens with age. However, recent studies have shown that most of those age-associated declines can be delayed by exercise. Exercise lowers the resting heart-rate and increases the amount of blood pumped with each beat in older people. When stress in placed on bones through exercise, calcium content rises, with the result that resistance to fracture is improved.

**11.** Old age is generally a depressing period because

(1) Old people worry more than others.

(2) Old people tend to regret their past.

(3) Various organs of the body function less efficiently

(4) Old people do very little work.

**12.** The strength of bones can be increased by exercise, because it :

(1) increases the amount of blood pumped by the heart.

(2) increases calcium content in bones.

(3) increase the amount of air exhaled by a person.

(4) lessens the stiffness of the chest wall.

**13.** The word 'exhale' means.

(1) breathe in. (2) breathe out.

(3) breathe slowly. (4) breathe fast.

**14.** Which one of the following statements is correct as per passage?

(1) Exercise delays natural decay of old age.

(2) Old age problems increase due to exercise.

(3) Exercise increases the heart-beat which is dangerous.

(4) Exercise creates stress which is harmful to bones.

**15.** The chest wall becomes stiff in old age, because_____.

(1) The heart's ability to pump blood to it drops about one percent.

(2) The blood flow to various organs decreases.

(3) The resting heart-rate becomes high.

(4) The person's ability to exhale sufficient air lessens.

**16.** Choose the one which best expresses the meaning of the idiom underlined.

His singing took the audience by storm.

(1) made happy (2) praised

(3) captivated (4) danced

**17.** Select the most appropriate alternative:

____computer allows to deal with____lot of data quickly

(1) a, the (2) the, the

(3) the, a (4) the, an



adda247

**18.** Fill in the blank with the most suitable alternative to make the sentence meaningfully complete:

If we tried hard, ____

(1) We can succeed
(2) We would succeed
(3) We may succeed
(4) We will succeed

**19.** Select grammatically correct sentence from the given sentences

(1) English is one of the most important language today
(2) English is one of most important languages today
(3) English is one of the most important languages today
(4) English is one of the important languages today

**20.** The cry of the goat is called ____

(1) growl (2) buzz (3) crook (4) bleat

**21.** Rearrange the given parts of the sentence which are labelled P, Q, R and S to make the most meaningful sentence.

(P) About 2000 years ago in the south of India (Q) an old king
(R) ruled over his kingdom (S) called Raja Raman

(1) Q S R P (2) S P Q R (3) Q P S R (4) Q P R S

**22.** Find out the part of sentence which has an error:

(A) The young child from the international school
(B) singed a very sweet song
(C) on the stage yesterday
(D) No error

(1) A (2) B (3) C (4) D

**23.** Identify the underlined clause in the given sentence:

It looks as if it might rain.

(1) Noun clause
(2) Adjective Clause
(3) Adverd clause of manner
(4) Adverb clause of result

**24.** Select the combination of number so that letter arranged accordingly will form a meningful word.

| I | P | E | L | O | C |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |

(1) 1 4 3 5 2 6 (2) 2 5 4 1 6 3 (3) 3 4 5 1 2 6 (4) 4 5 1 2 3 6

**25.** Choose the correct use of 'used to' in the given sentence:

He would get up before dawn in his schools days.

(1) He used to get up before dawn in his school days.
(2) He would used to get up before dawn in his school days.
(3) He used to got up before dawn in his school days.
(4) He used get before dawn in his school days.

**26.** Select the one which best expresses the following sentence in Indirect narration:

"How amazing it is!" I said.

(1) I exclaimed that it has been very amazing.
(2) I exclaimed that it was very amazing.
(3) I said that it was very amazing.
(4) I exclaimed that it is very amazing.

adda247

**27.** Choose the correct Question Tag for the given sentence:
Manorama cannot complete her work in time :
(1) can Manorama? (2) Can not she? (3) can she? (4) Cann't Manorama?

**28.** Select the correct compound sentence for the given sentence:
He must work very hard to make up for the lost time.
(1) He must work very hard for making up for the lost time.
(2) He must work very hard and make up for the lost time.
(3) He must work very hard so as to make up for the lost time.
(4) He must work very hard and made up for the lost time.

**29.** Choose the correctly spelt word:
(1) Hetrogenous (2) Hetrogeneous
(3) Hetterogenous (4) Heterogeneous

**30.** Select the word which is nearest in the meaning of the underlined words in the sentence :
1) tempest 2) snow storm with very strong winds
3) dangerous snowfall 4) storm in the desert

## भाग ३ : मराठी

**31.** 'मी आंबे आणून आढी घालून ठेवलेत' या वाक्याचा काळ ओळखा –
(1) पूर्ण वर्तमानकाळ (2) अपूर्ण भूतकाळ (3) रीती भविष्यकाळ (4) अपूर्ण वर्तमानकाळ

**32.** एकवचन-अनेकवचनाची योग्य जोडी ओळखा.
(1) वाट-वाटे (2) वाढपी-वाढपी (3) जोडी-जोडे (4) चूका-चुकी

**33.** पुल्लिंगी शब्द ओळखा.
(1) हकीकत (2) वैभव (3) पहाट (4) रहाट

**34.** चुकीच्या पद्धतीने केलेले सामान्य रूप ओळखा.
(1) कृत्य-कृत्य (2) विक्री-विक्री (3) युक्ती-युक्ती (4) मोती-मोत्या

**35.** 'आपले डावपेच आपल्यावरच उलटणे' या अर्थाची म्हण ओळखा.
(1) पहिले पाढे पंचावन्न (2) मुकी गाय फटके खाय
(3) गुरूची विद्या गुरूस फळली (4) इकडे आड तिकडे विहीर

**36.** 'सव्यापसव्य करणे' या वाक्प्रचाराचा योग्य अर्थ ओळखा.
(1) धार्मिक विधी करणे (2) यातायात करणे (3) कर्मठ असणे (4) मंत्रतंत्र करणे

**37.** उपसर्गघटित शब्द ओळखा.
(1) कुसंगती (2) कुमार (3) कुडी (4) कुळवणी

**38.** प्रत्ययघटित शब्द ओळखा.
(1) ऐनवेळा (2) निराकार (3) पडसाद (4) दिमाखदार

**39.** 'काय हाहाकार माजवला भूकंपाने' या वाक्यापुढे कोणते विरामचिन्ह हवे?
(1) पूर्णविराम (2) उद्‌गारवाचक (3) प्रश्नचिन्ह (4) अपसारण चिन्ह

40. 'माझ्या घरी जागेची मुळीच कमतरता नाही' या वाक्यातील अधोरेखित शब्दाची विभक्ती ओळखा.
(1) सप्तमी (2) प्रथमा (3) द्वितीया (4) षष्ठी

41. 'महाराष्ट्रात झालेला अवकाळी पाऊस प्रचंड नुकसान करून गेला' या वाक्यात पुढीलपैकी कोणत्या प्रकारचा शब्द मुळीच आलेला नाही?
(1) विशेषण (2) विशेषनाम (3) सामान्यनाम (4) सर्वनाम

42. ''ही जीवांची इतकी गरदी जगात आहे का रास्त? भरती मूर्खांचीच होत ना?'' ''एक तूच होसी जास्त'' या काव्यपंक्तीत पुढीलपैकी कोणता रस आढळतो?
(1) करुणरस (2) हास्यरस (3) बीभत्सरस (4) रौद्ररस

**पुढील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

राजकारणात संकटे आली की, इतिहास घडवण्याची संधीही येत असते. अशा वेळी ती संधी लाथाडावयाची आणि खुर्चीसाठी जीव टाकावयाचा, हे राजकारण नव्हे, हा तर पळपुटेपणा झाला. समोर टाकलेली संकटे छातीवर झेलण्यात पुरुषार्थ असतो. पळून जाण्यात नाही. प्रवाहाच्या विरूद्ध जाण्यात कर्तृत्व असते, प्रवाहपतित होण्यात नाही. मुद्दाम प्रवाहाच्या विरुद्ध जावे, असे मी म्हणत नाही. पण प्रसंग आला, तर तसे जाण्यातच बाणेदारपणा असतो. जे आव्हानाला सामोरे जातात, त्यांच्या वाट्याला कधी कधी दुःख येते; परंतू त्यांच्याकडूनच इतिहास घडतो.

43. 'इतिहास घडवण्याची संधी' या शब्दप्रयोगातून पुढीलपैकी कोणता अर्थ अभिप्रेत आहे?
(1) इतिहासाचे लेखन करण्याची संधी
(2) इतिहासाबदल स्पष्टीकरण देणे
(3) इतिहासात नोंद होईल असे काही करून दाखविण्याची संधी
(4) इतिहाससंशोधनाची संधी

44. 'पुरूषार्थ' म्हणजे काय?
(1) पुरुषी सामर्थ्य सिद्ध करणे (2) भित्रेपणावर मात करणे
(3) मानवजन्माचे सार्थक करणे (4) स्त्रियांवर वर्चस्व गाजविणे

45. 'प्रवाहपतित होणे' याचे चार अर्थ पुढे दिले आहेत. त्यापैकी चुकीचा, गैरलागू अर्थ ओळखा.
(1) प्रवाहात पडून वहात ज़ाणे (2) परिस्थितीला शरण जाणे
(3) संघर्ष करण्याऐवजी माघार घेणे (4) परिस्थितीवर विजय मिळवणे

46. समानार्थी शब्दांची योग्य जोडी ओळखा.
(1) आकर्ण-विकर्ण (2) अंबु-सलिल (3) हता-जिता (4) द्रुम-आलय

47. विरूद्धार्थी शब्दांची योग्य जोडी ओळखा.
(1) आगंतूक × निमंत्रित (2) सुचिन्ह × अचिन्ह (3) समर × संगर (4) वामा × श्यामा

48. पुढील नावांमधून मंगेश पाडगावकर यांच्या कवितासंग्रहाचे नसलेले नाव ओळखा.
(1) धारानृत्य (2) जिप्सी (3) छोरी (4) संहिता

49. लेखननियमांनुसार अचूक शब्द ओळखा.
(1) मुर्च्छित (2) कूर्मावतार (3) खडंन मडंन (4) शोक संप्तत

50. तद्भव शब्द ओळखा.
(1) विशेष (2) व्यक्ती (3) म्हैस (4) मारक



adda247

51. 'पुरुष' या नाटकाचे लेखक कोण?
(1) प्रशांत दळवी (2) अजित दळवी (3) तुषार दळवी (4) जयवंत दळवी

52. 'शिवप्रिया' हा सामासिक शब्द पुढीलपैकी कोणत्या समासाचे उदाहरण आहे?
(1) बहुव्रीही (2) तृतीया तत्पुरुष (3) मध्यमपदलोपी (4) द्विगु

53. 'जलावतरण' या संधीचा योग्य विग्रह ओळखा.
(1) जल+वतरण (2) जला+अवतरण (3) जल+अवतरण (4) जला+वतरण

54. 'दमयंतीस्वयंवर' या काव्याचे कवी कोण?
(1) वामन पंडित (2) रघुनाथ पंडित (3) मोरोपंत (4) निरंजन माधव

55. भाववाचक नसलेले नाम ओळखा.
(1) शौर्य (2) कटुता (3) गोडवा (4) कार्य

56. तत्सम शब्द ओळखा.
(1) विरक्त (2) भाऊ (3) डोके (4) पाऊस

57. 'या सत्तेत जीव रमत नाही' हा काव्यसंग्रह कोणाचा आहे?
(1) दया पवार (2) रामदास आठवले (3) नामदेव ढसाळ (4) राजा ढाले

58. उभयान्वयी नसलेले अव्यय ओळखा.
(1) किंवा (2) वाहवा (3) वा (4) व

59. विध्यर्थी नसलेले वाक्य ओळखा.
(1) पादत्राणे ओळीने ठेवावी (2) या कामी देवाची कृपा व्हावी
(3) त्याने बसमध्ये माझ्यासाठी जागा धरावी (4) माझ्यासाठी ही भाजी संध्याकाळला ठेव

60. पुढील नावांमधून आत्मकथनपर पुस्तकाचे नाव ओळखा.
(1) इजिप्तायन (2) श्यामिनी (3) बॅरिस्टर (4) गबाळ

## भाग ३ : बालमानसशास्त्र व अध्यापनशास्त्र

61. औद्योगिक क्षेत्रात उदय झालेली अत्याधुनिक अध्ययन पद्धती, ज्यामध्ये लोकांना नवीन कल्पनांचा, उपक्रमांचा अवलंब करून विकासशील व गतिमान रहावे लागते अशी खालीलपैकी कोणती अध्यापन पद्धती होय?
(1) बुद्धिमंथन पद्धती (2) समालोचन पद्धती (3) व्याख्यान पद्धती (4) दूरचित्रवाणी पद्धती

62. अध्यापन प्रतिमाने व त्यांचे उद्‌गाता यांच्या योग्य जोड्यांचा पर्याय कोणता?

| प्रतिमान | उद्‌गाता |
|---|---|
| (i) स्मरणशक्ती प्रतिमान | (अ) विल्यम गॉर्डन |
| (ii) सर्जनात्मक प्रतिमान | (ब) बायरन |
| (iii) सामाजिक पृच्छा प्रतिमान | (क) गॅग्ने |
| (iv) प्रत्यक्ष प्रशिक्षण प्रतिमान | (ड) जेरी ल्यूकस |

(1) (i) - अ (ii) - ब (iii) - क (iv) - ड
(2) (i) - ड (ii) - ब (iii) - अ (iv) - क
(3) (i) - ड (ii) - अ (iii) - ब (iv) - क
(4) (i) - ब (ii) - अ (iii) - क (iv) - ड



adda247

63. फ्लँडर्सच्या आंतरक्रिया विश्लेषणाची खालीलपैकी कोणती मर्यादा योग्य आहे?
(1) यात कृतीवर जास्त भर दिला जातो.
(2) यामध्ये निरीक्षकास अनन्य साधारण महत्त्व असते.
(3) निरीक्षणावरून निष्कर्ष सहजपणे काढता येतात.
(4) या तंत्रात पाठाबद्दलचे निरीक्षण ताबडतोब विद्यार्थ्यांना सांगता येतात.

64. खालीलपैकी कोणत्या प्रतिमानामुळे विद्यार्थ्यांच्या भावनिक विकासाला मदत होऊन विद्यार्थी संयमाने वागतात. तणाव असलेल्या परिस्थितीशी समतोल राखतात व आवश्यक तेथे पुढाकार घेऊन मदत करतात?
(1) व्यक्तिगत विकास प्रतिमान (2) वर्तन परिवर्तन प्रतिमान
(3) ज्ञान प्रक्रियाकरण प्रतिमान (4) सामाजिक आंतरक्रिया प्रतिमान

65. अध्ययन अक्षमता असणाऱ्या मुलांच्या शिक्षणाविषयी खालीलपैकी कोणते विधान अयोग्य आहे?
(1) या मुलांना अध्ययनासाठी जास्त वेळ द्यावा. (2) या मुलांना मानसोपचार तज्ञाकडे न्यावे
(3) त्यांच्यासाठी अमूर्ताकडून मूर्ताकडे न्या. (4) वेगवेगळे स्मरण खेळ त्यांना द्यावेत.

66. इ. स. १९५७ मध्ये मूलगामित्व ओघवतेपणा, लवचिकता व उत्पादकता हे निर्मायकतेचे घटक संशोधन करून पुढीलपैकी कोणत्या मानसशास्त्रज्ञाने मांडले?
(1) गिलफोर्ड (2) टर्मन
(3) जॅक्सन व मेसिक (4) गोपाल एस. के.

67. खाली दिलेल्या मानसशास्त्रज्ञांची नावे व त्यांनी दिलेल्या व्याख्या यांचा योग्य जोड्यांचा क्रम कोणता?

| मानसशास्त्रज्ञ | व्याख्या |
|---|---|
| (i) नॉर्मन मन | (अ) व्यक्तिमत्त्व म्हणजे व्यक्तिचे सामाजिक |
| (ii) ऑलपोर्ट | (ब) व्यक्तिमत्त्व म्हणजे शरीर रचना, वर्तनविशेष, अभिरूची, अभिवृत्ती, कृतीक्षमता, कर्तृत्व व कलाविशेष यांची गुंफण |
| (iii) एम. ए. मे | (क) व्यक्तिमत्त्व म्हणजे सामाजिक परिस्थितीत घडणाऱ्या व्यक्तिच्या वर्तनाची गोळाबेरीज |
| (iv) ए. ए. ट्रॅक्सलर | (ड) मानसिक यंत्रणांची संघटना म्हणजे व्यक्तिमत्त्व |

(1) (i) - ब (ii) - ड (iii) - अ (iv) - क
(2) (i) - अ (ii) - क (iii) - ब (iv) - ड
(3) (i) - क (ii) - ड (iii) - अ (iv) - ब
(4) (i) - ड (ii) - अ (iii) - ब (iv) - क

68. प्रायोगिक पद्धतीविषयी खाली दिलेल्या बाबीतून कोणती बाब अयोग्य आहे?
(1) या पद्धतीत पूर्वनियोजित वर्तनाचे वस्तुनिष्ठ निरीक्षण केले जाते.
(2) या पद्धतीत किमान दोन व्यक्तिची गरज असते.
(3) प्रयोजकाने प्रयोज्यावर पूर्ण नियंत्रण ठेवणे अनावश्यक आहे.
(4) या पद्धतीत फक्त जिवंत प्राणीमात्रांवरच प्रयोग केले जातात.



adda247

69. अध्ययन क्रियेतील प्रगतीस खालीलपैकी कोणते विधान सहाय्यभूत ठरत नाही?
(1) एखाद्या विषयात विशेष रूची असेल तर प्रगती वेगाने होते.
(2) जी गोष्ट शिकायची आहे तिचे अध्ययन पूर्वी काही प्रमाणात झालेले असेल तर ते प्रगतीला अपकारक ठरते.
(3) शिकण्यातील प्रगती काही प्रमाणात व्यक्तिच्या अनुवंशिक पात्रतेवर अवलंबून असते.
(4) शिकण्याच्या योग्य पद्धतीचा प्रगतीवर सुपरिणाम होतो.

70. खालीलपैकी कोणत्या स्त्रावामुळे व्यक्तीमध्ये चैतन्य निर्माण होते आणि त्याचे प्रमाण अधिक झाल्यास मुले वर्तनात अतिउत्साह दाखवतात?
(1) कॉर्टिसॉन (2) ॲड्रिनल (3) इन्शुलिन (4) थॉयरॉक्सिन

71. खाली दिलेल्या गरजांपैकी कोणती व्यक्तिगत गरज आहे?
(1) प्रतिष्ठा (2) सुरक्षा
(3) जोडीदाराची गरज (4) परावलंबित्व

72. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्यात ज्ञानरचनावादासंबंधी खालील पैकी कोणते तत्त्व समाविष्ट आहे?
(1) ज्ञान हे गतिशील नसून स्थितीशील आहे.
(2) स्थानिक परिसराचा विद्यार्थ्यांच्या ज्ञानरचनेत फारसा वाटा नसतो.
(3) पूर्वानुभवाच्या आधारे विद्यार्थी ज्ञान रचना करतात.
(4) सांस्कृतिक आंतरक्रियाद्वारे ज्ञानाची निर्मिती होत नाही.

73. एखाद्या कारकुनावर साहेब रागावले तर कारकून साहेबावर रागावू शकत नाही. तो घरी आल्यावर बायकोवर रागावतो. हे संरक्षण यंत्रणेच्या पुढीलपैकी कोणत्या प्रकारामुळे घडते?
(1) प्रक्षेपण (2) प्रतिपूरण (3) विस्थापन (4) आत्मताडन

74. विद्यार्थ्यांच्या मनातील चिंता, भीती, दडपण, गैरसमज, इ. दूर करून त्यांच्या वागणुकीत सुधारणा घडवून आणणे, समायोजन क्षमता वाढवणे, हे खालीलपैकी कोणत्या पद्धतीने साध्य होते?
(1) संशोधनात्मक मुलाखत (2) निदानात्मक मुलाखत
(3) उपचारात्मक मुलाखत (4) माहितीपर मुलाखत

75. इयत्ता 7 वी मधील 50 विद्यार्थ्यांमध्ये सचिनचा गणितातील गुणानुक्रम 4 था आहे. तर त्याचा शततमक क्रम किती?
(1) 08 (2) 10 (3) 02 (4) 06

76. खाली दिलेल्या विधानांमध्ये कोणते विधान विकास प्रक्रियेचे वैशिष्ट्य आहे?
(1) विकास प्रक्रियेत व्यक्तिभिन्नता आढळते.
(2) विकास प्रक्रियेत व्यक्तीचे जैविक घटक अप्रभावी असतात.
(3) प्रत्येक प्राणीजातीतील विकास प्रक्रिया ही सारख्या प्रकारची असते.
(4) विकासाची गती प्राथमिक अवस्थेमध्ये कमी असते.

77. जीन पियाजेच्या पुढीलपैकी कोणत्या अवस्थेमध्ये मूल अबोधाचे व संबोधाचे वर्गीकरण करायला शिकते आणि प्रत्यक्ष कृतीतून निष्कर्ष काढावयास शिकते?
(1) बौद्धिक विकासाची अवस्था (2) क्रियापूर्व प्रतिनिधित्वाचा काळ
(3) मूर्त क्रियाकाल अवस्था (4) शब्दपूर्व अवस्था



adda247

**78.** किशोरावस्थेत मुलांची प्रवृत्ती आपल्या मित्रांच्या टोळ्या करून राहण्याची असते, याचा शालेय उपक्रमातून फायदा करून घेण्यासाठी शिक्षकाने पुढीलपैकी कोणती बाब टाळावी?

(1) विद्यार्थ्यांचे त्यांच्या मर्जीनुसार गट करून त्यांच्या विविध स्पर्धा आयोजित कराव्यात.

(2) वर्गाच्या शांततेची, सजावटीची जबाबदारी विद्यार्थ्यांवर टाकावी.

(3) विद्यार्थ्यांनी केलेल्या तक्रारीकडे गांभिर्याने पहावे.

(4) टोळी करून विध्वंसक कार्य करायला उद्युक्त होणार नाही हे पहावे.

**79.** व्यक्तिविकासामध्ये अनुवंश व परिस्थिती या दोन्ही गोष्टी महत्त्वाच्या आहेत; या संदर्भात खाली दिलेल्या विधानांमध्ये कोणते विधान असत्य आहे?

(1) सांस्कृतिक परिस्थितीचा बालकाच्या विकासावर परिणाम होतो.

(2) विकासासाठी लागणारी मूळ शक्ती पुरवण्याचे काम अनुवंशिकतेकडून होते.

(3) सर्वसाधारण बालकाला रंग, रूप, उंची या बाबी अनुवंशिकतेने प्राप्त होतात.

(4) विकासाला वळण व दिशा देण्याचे काम अनुवंश करते.

**80.** 'मानसिक वय हा संबोध म्हणजे बुद्धिमापन क्षेत्रातील बीनेची मोठी देणगी होय' याविषयी खालीलपैकी कोणते विधान योग्य आहे?

(1) शारीरिक विकासाप्रमाणे व्यक्तीचा मानसिक विकास होतोच असे नाही.

(2) मानसिक विकासाचा वेग सर्वांचा सारखाच असतो.

(3) व्यक्तीच्या जन्मजात बौद्धिक क्षमतेवर मानसिक विकास अवलंबून नसतो.

(4) सामान्यतः जन्मवयाच्या १६ व्या वर्षी मानसिक विकास पूर्णत्वाला पोहोचतो.

**81.** थॉर्नडाईक यांनी बुद्धिविषयक उपपत्ती मांडतांना स्पिअरमन यांच्या उपपत्तीवर आक्षेप केलेल्या मतांमधील खालीलपैकी कोणते विधान असत्य आहे?

(1) बुद्धी ही मज्जातंतू आणि त्यांचे परस्पर निगडीत होणे यावर अवलंबून असते.

(2) मज्जातंतूमधील प्रक्रिया गुतांगुंतीच्या आहेत.

(3) बुद्धिचे सर्वसामान्य व विशिष्ट घटक हे शास्त्रीय स्वरूपाचे आहेत.

(4) एखादे बौद्धिक कार्य कोणत्या दर्जाचे होईल हे मज्जातंतूमधील प्रक्रियेवर अवलंबून आहे.

**82.** व्यक्तीमध्ये ज्या विविध भावना असतात त्यांचे प्रसंगानुरूप प्रकटीकरण होऊन व्यवस्थापन होणे म्हणजे भावनिक बुद्धिमत्ता होय. या विषयी खालीलपैकी कोणते विधान अयोग्य आहे?

(1) व्यक्तिला स्वतःच्या भावनांची ओळख होणे गरजेचे असते.

(2) भावनेचे प्रकटीकरण किती तीव्रतेने व्हावे याचे व्यवस्थापन होणे गरजेचे असते.

(3) एखादी दुःखद घटना पाहून दुःख होणे ही नैसर्गिक बाब असते.

(4) इतरांच्या भावनांची ओळख होणे अनावश्यक असते.

**83.** खाली दिलेल्या विधानांमध्ये कोणते विधान हे अवधानचे वैशिष्ट्य नाही?

(1) अवधान ही निवडक प्रक्रिया आहे.

(2) अवधानामुळे ज्ञानग्रहण व आकलन होते.

(3) एखादी आंतरिक बाबींवर एकाग्र होत नाही.

(4) अवधान एखाद्या गोष्टीवर दीर्घकाळ टिकवून ठेवता येत नाही.



adda247

84. संवेदनाची निवड ही चेतकाच्या स्वरूपावर अवलंबून असते. खालील चित्राचे अवबोध होत असतांना त्यांच्या संवेदनाचे वर्गीकरण खालील पैकी कोणत्या रचनेत होईल?




(1) समीपता
(2) साधर्म्य
(3) सातत्य
(4) पूर्णत्व

85. खाली दिलेल्या विधानांमध्ये कोणते विधान धारणेच्या स्वरूपाविषयी समर्थन करत नाही?
(1) आपण नुकत्याच अनुभवलेल्या गोष्टींच्या धारणेची मज्जाप्रक्रिया काही काळपर्यंत चालू राहते.
(2) धारणा निरनिराळ्या पातळीवर असते.
(3) कोणत्याही व्यक्तीची धारणाशक्ती सर्वच गोष्टींच्या बाबतीत सारखी असत नाही.
(4) एका विषयाचे पठन संपताच दुसऱ्या विषयाचे पठन सुरू केले की धारणा चांगली होते.

86. खालीलपैकी कोणते उदाहरण निर्मायक विचाराचे नाही?
(1) शास्त्रज्ञ शोध लावतात.
(2) शिल्पकार वस्तुशिल्प तयार करतात.
(3) शिक्षक उद्गामी पद्धतीने शिकवतात.
(4) शिक्षक निसर्गचित्र काढतात.

87. खाली दिलेल्या संबोधाविषयीच्या विधानांपैकी कोणते विधान अयोग्य आहे?
(1) पुरेसे व स्पष्ट संबोध निर्माण झालेले नसतील तर विचार प्रक्रियेत अडथळे येतात.
(2) इतरांचे विचार नीट समजण्यासाठी तसेच स्वतःचे विचार नीट मांडता येण्यासाठी संबोध स्पष्ट व अचूक हवेत.
(3) मूळ संबोध स्पष्ट नसतील तरीही पुढेच संबोध सहजपणे स्पष्ट होतात.
(4) ज्ञान ग्रहणात संबोध फार महत्त्वाचे आहेत.

88. प्रतिमेचे प्रकार व त्यांचे उदाहरण यांच्या जोड्यांचा योग्य पर्याय कोणता?

| प्रतिमा प्रकार | उदाहरण |
|---|---|
| (i) गतिप्रतिमा | (अ) मखमलाचा मऊपणा जाणवणे |
| (ii) स्वाद प्रतिमा | (ब) कचराकुंडीच्या जवळून जातांना नाकाला रूमाल लावणे |
| (iii) गंध प्रतिमा | (क) वाहनांच्या वेगाची तुलना करणे |
| (iv) स्पर्श प्रतिमा | (ड) अन्नाची चव लक्षात राहणे |

(1) (i) - ब (ii) - अ (iii) - क (iv) - ड
(2) (i) - अ (ii) - क (iii) - ड (iv) - ब
(3) (i) - क (ii) - ड (iii) - ब (iv) - अ
(4) (i) - ड (ii) - क (iii) - अ (iv) - ब

89. जेव्हा अध्ययनकर्ता नवीन परिस्थितीमध्ये प्रतिसाद देतांना पूर्वानुभवाचा उपयोग करतो तसेच नवीन नवीन परिस्थितीशी साधर्म्य असणाऱ्या जुन्या परिस्थितीत दिलेला प्रतिसाद तो नवीन परिस्थितीत देतो तेव्हा थॉर्नडाईकच्या कोणत्या उपनियमाचा वापर केला जातो?
(1) प्रतिक्रियांच्या वैविध्याचा नियम
(2) प्रतिक्रियांच्या समानतेचा नियम
(3) मांडणी किंवा रचना
(4) घटकांची पूर्वशक्ती

adda247

90. डॉ. आर्मस्ट्राँग यांनी मांडलेली शास्त्र आणि विज्ञान तसेच तर्कशास्त्रासाठी उपयोगी ठरणारी खालील पैकी कोणती पद्धती होय?

(1) संशोधन पद्धती
(2) परिसंवाद पद्धती
(3) समवाय पद्धती
(4) समालोचन पद्धती

## भाग ३ : सामाजिक शास्त्रे

91. सोनेरी गरूड पक्ष्याचे चिन्ह ................घराण्याचे आहे.

(1) चालूक्य (2) शिलाहार (3) सातवाहन (4) वाकाटक

92. 'स्त्रीधर्मनीती' या ग्रंथाच्या लेखिका..............होत.

(1) पंडिता रमाबाई
(2) ताराबाई शिंदे
(3) रमाबाई रानडे
(4) ताराबाई मोडक

93. ..............संस्थानावरील लढाईची योजना 'ऑपरेशन पोलो' या सांकेतिक नावाने ओळखली जाते.

(1) जुनागढ (2) काश्मिर (3) हैद्राबाद (4) सातारा

94. १५५६ मध्ये भारतात पहिले मुद्रणालय...............येथे सुरू झाले.

(1) कालिकत (2) हुगळी (3) सुरत (4) गोवा

95. मराठी विश्वकोशाचे पहिले संपादक...............होत.

(1) डॉ. श्रीधर व्यं. केतकर
(2) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी
(3) पं. महादेवशास्त्री जोशी
(4) श्रीमती विजया वाड

96. पंचायत समितीच्या सभापतीची व उपसभापतीची मुदत...............वर्षांची असते.

(1) अडीच (2) तीन (3) पाच (4) दोन

97. नगरपरिषदेच्या प्रशासन यंत्रणेचा नियुक्त प्रमुख कोण असतो?

(1) गटविकास अधिकारी
(2) मुख्य कार्यकारी अधिकारी
(3) आयुक्त
(4) मुख्याधिकारी

98. संविधानाच्या अंमलबजावणीसाठी २६ जानेवारी हा दिवस निश्चित करण्यात आला कारण.......

(1) संविधान सभेने हा दिवस निश्चित केला.
(2) भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हा दिवस सुचविला.
(3) 'पूर्ण स्वराज्याच्या मागणीसाठी १९३० पासून हा दिवस 'स्वराज्य दिन' म्हणून साजरा केला जात असे.
(4) या दिवशी संविधान पूर्ण झाले.

99. भारतात राजा, महाराजा, रावबहादूर यासारख्या पदव्या रद्द केल्या आहेत कारण............

(1) मूलभूत हक्कांना संरक्षण असणे नागरिकांसाठी फार महत्त्वाचे असते.
(2) लोकांमध्ये श्रेष्ठ व कनिष्ठ असा भेद दाखविणाऱ्या पदव्या देण्यास संविधानाने बंदी घातली आहे.
(3) सर्व भारतीयांना समान संधी देण्याच्या हमीस बाधा येते.
(4) नागरिकांच्या शोषणाविरूद्धच्या हक्कास बाधा येते.

**100.** भारत हे एक सार्वभौम राष्ट्र आहे कारण.................

(1) 1947 साली भारत देश स्वतंत्र झाला.

(2) भारताचे परराष्ट्र धोरण स्वतंत्रपणे ठरविले जाते.

(3) भातर हे बाह्य नियंत्रण नसणारे व अंतर्गत क्षेत्रात सर्वश्रेष्ठ असलेले व स्वतंत्रपणे आपला कारभार करणारे राष्ट्र आहे.

(4) भारताचे लष्कर प्रबळ व अत्याधुनिक आहे.

**101.** भारतीय निमलष्करी दलात पुढीलपैकी कोणाचा समावेश होत नाही?

(1) गृहरक्षक दल (2) सीमा सुरक्षा दल

(3) जलद कृती दल (4) तटरक्षक दल

**102.** शाळा व महाविद्यालयातील प्रवेशा संदर्भातील स्त्रिया व दुर्बल घटकांसाठी राखीव जागा असतात हे ..............उदाहरण आहे.

(1) स्वातंत्र्याच्या अधिकाराचे

(2) समानतेच्या अधिकाराचे

(3) पिळवणूकी विरूद्धच्या अधिकाराचे

(4) शैक्षणिक व सांस्कृतिक अधिकाराचे

**103.** भारताच्या फाळणीनंतर संविधान सभेची सदस्य संख्या.............इतकी झाली.

(1) 229 (2) 299

(3) 70 (4) 389

**104.** अमेरिकेत संविधानाची/घटनेची गरज निर्माण झाली कारण..............

(1) तिथे राजकीय क्रांती झाली.

(2) लोकांनी परकीय सत्ता स्वीकारण्यास नकार दिला.

(3) छोटी राज्ये एकत्र येऊन नवीन देश तयार झाला.

(4) राज्याचे विभाजन होऊन दोन किंवा अधिक राज्ये तयार झाली.

**105.** घटक राज्यातील विधानसभेच्या निवडणूका पार पाडण्याची जबाबदारी........यांची असते.

(1) निवडणूक आयोग (2) विधानसभा

(3) राज्य मंत्रीमंडळ (4) राज्यपाल

**106.** खाली दिलेल्या जोड्यांमधील चुकीची जोडी ओळखा

(1) तोरणा-प्रचंडगड (2) मुरूंबदेव-विशाळगड

(3) रायरी-रायगड (4) भोरप्या-प्रतापगड

**107.** तोरणा किल्ला पुण्याच्या...............आहे.

(1) नैऋत्येस (2) ईशान्येस

(3) वायव्येस (4) आग्नेयेस

**108.** भारतातील पारशी समाज उपयोगात आणत असलेल्या कालगणनेच्या पद्धतीला........कालगणना म्हणतात.

(1) हिजरी (2) शालिवाहन शक

(3) विक्रम संवत (4) शहेनशाही



adda247

109. उर, उरूक, निप्पुर ही..........मधील प्राचीन नगरे होत.

(1) इजिप्त (2) चीन

(3) मेसोपोटेमिया (4) हडप्पा

110. प्रसिद्ध वैद्य जीवक.............या राज्याशी संबंधित आहे.

(1) अवंती (2) मगध (3) चेदी (4) अश्मक

111. 'अ' गटातील ग्रंथांची 'ब' गटातील विधानांशी योग्य जोडी जुळवा

| अ गट | ब गट |
|---|---|
| (अ) ऋग्वेद | (i) ऋग्वेदातील ऋचा तालासुरात गायनाचे मार्गदर्शन |
| (ब) यजुर्वेद | (ii) निसर्गाचे काव्यमय वर्णन |
| (क) सामवेद | (iii) यज्ञात वापरावयाचे मंत्र |
| (ड) अथर्ववेद | (iv) दैनंदिन जीवनातील अडचणी, संकटांवर उपाय |

(1) अ - (ii) ब - (iii) क - (i) ड - (iv)

(2) अ - (iii) ब - (ii) क - (i) ड - (iv)

(3) अ - (iv) ब - (iii) क - (i) ड - (ii)

(4) अ - (ii) ब - (iv) क - (i) ड - (iii)

112. अमोघवर्ष: मालखेड :: पहिला राजेंद्र : ?

(1) अलाहबाद (2) तंजावर (3) गंगैकोंडचोलपुरम (4) बदामी

113. सुफी पंथ मूळचा...........आहे

(1) इराकमधील (2) इराणमधील (3) भारतातील (4) अरबस्तानातील

114. १८५७ च्या उठावनंतर बेगम हजरत महल यांनी.............मध्ये आश्रय घेतला.

(1) रंगून (2) मंडाले (3) कानपूर (4) नेपाळ

115.. अनाथ बालिकाश्रमाची स्थापना ....... यांनी केली.

(1) महात्मा फुले (2) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे

(3) महर्षी धोंडो केशव कर्वे (4) विष्णुशास्त्री पंडित

116. 'हे स्वराज्य नव्हे आणि त्याचा पायाही नव्हे' अशा शब्दात लोकमान्य टिळकांनी.........यावर टीका केली.

(1) मॉंटग्यू-चेम्सफर्ड कायदा (2) मॉर्ले-मिंटो सुधारणा कायदा

(3) रौलेट कायदा (4) सायमन कमिशन

117. कुंदग्राम, पावा, दीनाजपूर, उदयगिरी ही तीर्थक्षेत्रे..........धर्माशी संबंधित आहेत.

(1) बौद्ध (2) जैन (3) वैदिक (4) इस्लाम

118. .........याने स्वीकारलेल्या प्रोटेस्टंट पंथाच्या शाखेस प्युरिटन म्हटले जाते.

(1) जॉन कॅल्व्हिन (2) झ्विंगली

(3) इरॅस्मस (4) मार्टिन ल्युथर

119. अलेक्झांडर पुष्किन हा ............विचारवंत होय

(1) रशियन (2) जर्मन (3) फ्रेंच (4) ऑस्ट्रियन

120. दक्षिण आफ्रिकेतील 'केप ऑफ गुड होप' (आशेचे भूशीर) याचा शोध कोणी लावला?

(1) कॅप्टन स्पेक (2) डेव्हिड लिव्हिंग्स्टन

(3) स्टॅन्ले (4) बार्थोलोम्यू डायस



adda247

121. महाराष्ट्रात सर्वात जास्त लिंग गुणोत्तर असलेला जिल्हा..........
(1) सिंधुदुर्ग (2) रत्नागिरी (3) रायगड (4) ठाणे

122. महाराष्ट्रात राज्यातील एक नवी रेल्वे, ही गाडी म्हणजे फिरता राजमहाल होय.........
(1) डेक्कनक्वीन (2) डेक्कनएक्सप्रेस
(3) डेक्कनओडिसी (4) सिंगडएक्सप्रेस

123. महाराष्ट्रात खालीलपैकी कोणत्या ठिकाणी भात संशोधन केंद्र नाही.........
(1) कर्जत (2) खोपोली
(3) रत्नागिरी (4) अलिबाग

124. विभाजित वर्तुळ ही .......आकृती आहे.
(1) एकमितीय आकृती (2) द्विमितीय आकृती
(3) त्रिमितीम आकृती (4) संख्याशास्त्रीय आकृती

125. अंदमान-निकोबार बेटे हे दोन वेगळे समूह एका खोल खाडीने विभागले गेले आहेत. त्या खाडीस...... असे म्हणतात.
(1) आठ अक्षांश खाडी (2) नऊ अक्षांश खाडी
(3) दहा अक्षांश खाडी (4) अकरा अक्षांश खाडी

126. 'गर्हजात' डोंगरांनी.........राज्याचा वायव्य भाग व्यापला आहे.
(1) बिहार (2) झारखंड
(3) छत्तीसगढ (4) ओडिसा

127. हरियाणातील अंबाला शहर............नावाने ओळखले जाते.
(1) विज्ञान शहर (2) शैक्षणिक शहर
(3) ऐतिहासिक शहर (4) व्यापारी शहर

128. मोसमी वनातील वृक्षांमध्ये आर्थिकदृष्ट्या महत्त्वाचा वृक्ष कोणता?
(1) एबनी (2) साग
(3) एलम (4) ओक

129. ॲटिलेज द्वीपसमूह.........समुद्रात आहे.
(1) आर्क्टिक (2) बफिन
(3) कॅरेबियन (4) अटलांटिक

130. हिमालयातील कैलासपर्वत रांगेत तिबेटमध्ये बोखर 'चू' जवळ .........नदी उगम पावते.
(1) सिंधू (2) झेलम
(3) चिनाब (4) सतलज

131. इटलीतील व्हिस्यूव्हियस व अलास्कातील काटमाई ही.........प्रकारच्या ज्वालामुखीची उदाहरणे होत.
(1) जागृत (2) निद्रिस्त/सुप्त
(3) मृत (4) भ्रंशमूलक

132. चहा पिकाखालील क्षेत्र आणि उत्पादनात चीनचा जगात.............क्रमांक लागतो
(1) चौथा (2) तिसरा
(3) दुसरा (4) पहिला


adda247

133. 'पनामा' या कालव्यास.......चे प्रवेशद्वार असे म्हणतात.
(1) अटलांटिक महासागराचे
(2) पॅसिफिकचे
(3) हिंदी महासागराचे
(4) भूमध्य सागराचे

134. ............चा उपयोग हा मुख्यत: आण्विक इंधन म्हणून अणु विद्युतनिर्मिती केंद्रामध्ये केला जातो.
(1) कोळसा (2) खनिज तेल (3) नैसर्गिक वायू (4) थोरियम

135. खालील आकृतीमध्ये 'हिमवृष्टी' चा योग्य पर्याय ओळखा




(1) (2) (3) (4)

136. पृथ्वी सुर्याभोवती प्रदक्षिणा घालते याला..............म्हणतात.
(1) परिवलन (2) परिभ्रमण (3) अक्षीय गती (4) कक्षीय गती

137. पृथ्वीच्या पृष्ठभागावरील सर्वात मोठे अक्षवृत...........
(1) रेखावृत्त (2) बृहद्वृत्त (3) विषुववृत्त (4) प्रकाशवृत्त

138. 'माजुली' हे नदीच्या पात्रातील, जगातील सर्वात मोठे बेट............नदीच्या पात्रात आहे.
(1) कोशी (2) गंडक (3) गंगा (4) ब्रम्हपुत्रा

139. सूर्य आणि लघु ग्रहांचा पट्टा यांच्या दरम्यान असलेल्या ग्रहांना.........म्हणतात.
(1) बहिर्ग्रह (2) अंतर्ग्रह (3) उपग्रह (4) ब्रम्हपुत्रा

140. 'ट्विन टॉवर' ही जगप्रसिद्ध-इमारत पाहण्यासाठी पर्यटक..........येथे येतात.
(1) पुत्रजया (2) जॉर्ज टाऊन (3) क्वालालंपुर (4) पेराक

141. गॅलीली पर्वतरांगा हा............मधील सर्वात उंच प्रदेश आहे.
(1) जपान (2) सौदी अरेबिया (3) मलेशिया (4) इस्त्राईल

142. समुद्र सपाटीवर वायुदाब..........मिलीबार असतो.
(1) 1013.2 (2) 1014.2 (3) 1015.2 (4) 1016.2

143. चंद्राच्या प्रकाशीत भागाचा रोज बदलणारा भाग..........
(1) पौर्णिमा (2) चंद्रकला (3) अपभू (4) उपभू

144. सागरीजलात..........चे प्रमाण सर्वात अधिक असते
(1) कार्बोनेट (2) कॅल्शियम
(3) सोडियम क्लोराइड (4) सिलिका

145. ..............या शहराजवळ 'गीझा' येथील पिरॅमिड जगप्रसिद्ध आहे.
(1) पोर्ट सैद (2) आस्वान
(3) अनेक्झांड्रिया (4) कैरो

146. खालीलपैकी कोणता व्यवसाय शेतीला पूरक ठरतो.
(1) खाणकाम व्यवसाय (2) पशुपालन व्यवसाय
(3) मासेमारी व्यवसाय (4) व्यापार व्यवसाय

147. चुनखडीच्या प्रदेशात............हे भूरूप तयार होते.
(1) विलयछिद्रे (2) अवहन खळगे (3) बारखाण (4) खाजण

148. अंटार्क्टिका खंडातील सर्वोच्च शिखर..........
(1) सर रॉन्डम (2) व्हिन्सन मॅसिफ
(3) सिडली (4) मुर्चीसन

149. सार्क (SAARC) संघटनेच्या स्थानेसाठी कोणत्या देशाने पुढाकार घेतला?
(1) नेपाळ (2) श्रीलंका (3) भारत (4) पाकिस्तान

150. वाहतूक आणि दळणवळण ह्या अर्थव्यवस्थेच्या रक्तवाहिन्या मानल्या जातात कारण...........
(1) वाहतुकीमुळे देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापाराला चालना मिळते.
(2) वैयक्तिक उत्पन्न वाढते.
(3) शेतीपूरक उद्योगाचा विकास होतो.
(4) ग्रामीण लोकांसाठी हा उत्पन्नाचा मार्ग आहे.

adda247

❋ ❋ ❋

# महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०१८
## पेपर २ (माध्यम : मराठी) परीक्षा दि. १५-जुलै-२०१८
## अंतिम उत्तरसूची -२४-७-२०१८
## (व्दारा -महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे)

| इंग्रजी | मराठी | बालमानसशास्त्र व अध्यापनशास्त्र | सामाजिक शास्त्र | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. 2 | 31. 1 | 61. 1 | 91. 2 | 121. 2 | |
| 2. 3 | 32. 2 | 62. 3 | 92. 1 | 122. 3 | |
| 3. 2 | 33. 4 | 63. 2 | 93. 4 | 123. 4 | |
| 4. 2 | 34. 1 | 64. 2 | 94. 3 | 124. 2 | |
| 5. 3 | 35. 3 | 65. 3 | 95. 2 | 125. 3 | |
| 6. 2 | 36. 2 | 66. 1 | 96. 1 | 126. 4 | |
| 7. 4 | 37. 1 | 67. 1 | 97. 3 | 127. 1 | |
| 8. 2 | 38. 4 | 68. 3 | 98. 2 | 128. 2 | |
| 9. 3 | 39. 2 | 69. 2 | 99. 4 | 129. 3 | |
| 10. 4 | 40. 1 | 70. 2 | 100. 3 | 130. 1 | |
| 11. 3 | 41. 4 | 71. 1 | 101. 1 | 131. 2 | |
| 12. 2 | 42. 2 | 72. 3 | 102. 2 | 132. 4 | |
| 13. 2 | 43. 3 | 73. 3 | 103. 1 | 133. 2 | |
| 14. 1 | 44. 3 | 74. 3 | 104. 1 | 134. 4 | |
| 15. 4 | 45. 4 | 75. 1 | 105. 4 | 135. 3 | |
| 16. 3 | 46. 2 | 76. 1 | 106. 2 | 136. 2 | |
| 17. 3 | 47. 1 | 77. 3 | 107. 1 | 137. 3 | |
| 18. 2 | 48. 4 | 78. 3 | 108. 3 | 138. 4 | |
| 19. 3 | 49. 2 | 79. 4 | 109. 4 | 139. 2 | |
| 20. 4 | 50. 3 | 80. 4 | 110. 2 | 140. 3 | |
| 21. 1 | 51. 4 | 81. 3 | 111. 1 | 141. 4 | |
| 22. 2 | 52. 1 | 82. 4 | 112. 4 | 142. 1 | |
| 23. 3 | 53. 3 | 83. 3 | 113. 3 | 143. 2 | |
| 24. 2 | 54. 2 | 84. 1 | 114. 2 | 144. 3 | |
| 25. 1 | 55. 4 | 85. 4 | 115. 3 | 145. 4 | |
| 26. 2 | 56. 1 | 86. 3 | 116. 1 | 146. 2 | |
| 27. 3 | 57. 3 | 87. 3 | 117. 2 | 147. 1 | |
| 28. 2 | 58. 2 | 88. 3 | 118. 2 | 148. 2 | |
| 29. 4 | 59. 4 | 89. 2 | 119. 3 | 149. 3 | |
| 30. 2 | 60. 4 | 90. 1 | 120. 1 | 150. 1 | |

# - ने दर्शविलेले प्रश्न रद्द करण्यात आले आहेत.